# प्रशासन आणि आदिवासी समुदायाचा विकास (गडचिरोली जिल्हयाच्या संदर्भात विशेष अध्ययन)

**प्रा. डॉ. गणेश बी. खुणे** महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**गोषवारा :–**

गडचिरोली हा अतिमागास जिल्हा असून यामध्ये प्रामुख्याने वास्तव्यात असलेला आदिवासी जनसमुदाय हा बाहुल्य स्थितीत आहे. "गडचिरोली जिल्हयात 2001 च्या जनगणनेनूसार एकूण लोकसंख्येच्या 38.70 प्रतिशत (371696) लोकसंख्या अनूसूचित जमातीची असून 187017 पुरूष तर 184671 स्त्रियांचा समावेश आहे."[1] हा प्रवर्ग वर्षावनुवर्ष खितपत पडलेल्या स्थितीत आहे. वर्षानुवर्ष या वर्गाला स्वताच्या प्रगतीकडे नेण्याचा मार्ग निर्माण करता आला नाही. या वर्गाच्या वीकासाकरिता शासनाने अनेक योजना निर्माण केल्यात. त्यामुळे या वर्गाची प्रगती झपाटयाने होईल असे वाटले. पंरतू योजनांची निर्मिती होउन चालनार नाही तर, त्यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासन यंत्रनेची असते की प्रशासन कितपत जनताभिमुख आहे. पंरतु सदयस्थितीतील याप्रवर्गाची स्थिती लक्षात घेता प्रशासन वर्ग पाहिजे त्या प्रमाणात जनताभिमुख न झाल्याने, ते या आदिवासी भागात अत्याधिक सक्रिय न झाल्याने अनेक विकास योजना आदिवासींपर्यंत पोहचल्या नाहीत. ही आदिवासी जमात अजुनही विकासाच्या कोसो दुर आहे. "आदिवासीचे जिवन अति कष्टाचे मागासलेले व यातनापूर्ण आहे. अपूरी व अप्रगत शेती, कर्जबाजारीपणा, वेठबिगाार पदधती, व्यापारी, सावकार, जमिन मालकांकडून होणारे शोषन व प्रगत समाजाशी आलेल्या संपर्कानि निर्माण झालेले नवनविन प्रश्न यामुळे आदिवासी समुदाय आपले स्वत्व गमावून बसला आहे."[2]

शासनाच्या अनेक विकासयोजना असल्या तरी त्याची अमंलबजावणी प्रशासनाने न केल्यामुळे या योजनाचा लाभ सदर वर्गाला प्राप्त झाला नाही व हा वर्ग विकासापासून व प्रगतीपासून वंचीत आहे. याला मुख्य कारण म्हणजे प्रशासनवर्गाचे अलीप्तवादी धोरण होय. यामुळे हा प्रवर्ग मुख्य प्रवाहात येउ शकला नाही. कदाचीत याला इतरही अनेक करणे जबाबदार असली उदा. नक्षलवाद, अशिक्षितपणा, दळणवळणाच्या सोयींचा अभाव, घणदाट जंगल, तरीपण प्रशासन वर्गाने या सर्व बाबींकडे दुर्लक्ष केल्याने या समस्या या भागात आवासून उभ्या राहील्या व हा वर्ग विकासप्रवाहात येउ शकला नाही.

**बिजसंज्ञा :–**

प्रशासन, आदिवासी समुदाय, शासनाच्या योजना, आदिवासी विकास, प्रशासनाची कार्यकुशलता, गडचिरोली जिल्हा.

**प्रस्तावना :–**

प्रशासन हा शासन व जनता यांना जोडणारा महत्वाचा दुवा आहे. शासनाच्या प्रत्येक योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. "आदिवासींच्या विकासासाठी शासनाच्या 300 योजना असून त्या विविध विभागांमार्फत चालविण्यात येतात. मा. अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळाने सर्वप्रथम आदिवासी विकासासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करून त्यास आदिवासी व्यवहार मंत्रालय असे नांव देण्यात येउन कॅबिनेट दर्जाचा मंत्री त्याचा प्रमुख व राज्य दर्जाचा मंत्री त्यात देण्यात आला."[3] प्रशासन शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करुन जनतेप्रती आपली सहकार्याची व जनताभीमुख अमिट छाप निर्माण करते. कोणतेही शासन आपली प्रगती व कार्यक्षमता प्रशसनाच्या कार्यकुशलतेच्या मापदंडावरच मोजत असते. किंबहुना शासनाची कार्यकुशलता व कार्यक्षमता मोजण्याचे महत्वाचे मापदंड म्हणजे प्रशासनाची कार्यकुशलता व गतिमानता हेच आहे. प्रशासन जितके कार्यकुशल त गतिमान असेल तितकाच विकासाचा वेग अधिक असतो व जनतेची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत असते.

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जनसमुदायाची प्रगती, विकास यांचे रेखाटन करतांना प्रशासन या जबाबदार घटकाकडे कसोशीने लक्ष पूरविने अगत्याचे ठरते. जिल्हयातील आदिवासी समुदायाच्या स्थितीत आलेले बदल, एकूणच त्यांची विकासाची स्थिती लक्षात घेता प्रशासनाची भूमिका व कार्य याकडे लक्ष देणे अधिक अनिवार्य ठरते. आदिवासी समुदायाची प्रगती व विकास होण्यामागे प्रशासनाची भूमिका किती महत्वाची आहे? किंबहूना प्रशासन जिल्हयातील आदिवासी समूदायाच्या उत्थानाकरिता कितपत शास्वत ठरले ? शासनाच्या योजना या समुदायांपर्यंत पोहचवून सदर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य या प्रशासन व्यवस्थेकडून झाले किंवा नाही, शासनाच्या योजना या समुदायापर्यंत कसोशीने पोहचल्या किंवा नाही, या व अशा अनेक प्रश्नांसंदर्भात प्रशासनाची भूमिका व कार्याचे मूल्यमांपन करणे अगत्याचे ठरते. प्रशासनाची कार्यकुशलता, समाजाभिमूखता यांचा अभ्यास सदर संशोधनपत्राव्दारे करुन आदिवासी समुदाय आणि प्रशासन यांचात संबंध कितपत सुदृढ व निरोगी आहेत हे तपासण्याचे कार्य करण्यात आले आहे.

**संशोधन क्षेत्र :–**

संशोधन क्षेत्र संपूर्ण गडचिरोली जिल्हा असून सदर जिल्हयातील आदिवासी समुदायावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या जिल्हयातील 12 तालुक्यात बाहुल्य स्थितित असणारा आदिवासी समुदाय व जिल्हयातील कार्यरत प्रशासन यंत्रणा यावर सदर संशोधन लेखातून भाष्य करण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तूत संशोधनामध्ये सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**नमूना निवड :–**

संशोधन क्षेत्र गडचिरोली जिल्हयातील 12 तालुके आहेत. या बाराही तालूक्यात हा समाज बाहूल्य स्थितीत आहे. त्यामुळे प्रत्येक एककावर लक्ष केंद्रीत करने अशक्य असल्याने 600 आदिवासी लोकांची निवड करण्यात आली आहे. त्यात स्त्रि–पुरुषांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 45 टक्के व 55 टक्के असे ठरविण्यात आले आहे. हे एकक निवडतांना सोईस्कर यादृच्छीक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

प्रत्येक तालुक्याला सारखे महत्व मिळावे म्हणून प्रत्येक तालूक्यातून 50 एककाची निवड करण्यात आली आहे व या प्रत्येक एककाकडून मुलाखत अनुसूचि भरुन घेण्यात आली आहे.

**संशोधनाचे महत्वः–**

शासन आणि जनता यांना जोडणारा दुवा म्हणजे प्रशासन यंत्रणा होय. ही यंत्रणा जितकी कार्यक्षम व सक्रिय असेल तितकीच त्या देशाची शासनव्यवस्था कार्यक्षम मानल्या जाते. व जनतेला शासनाच्या योजनांचे फळे चाखायला मिळतात व देशाचा व देशातील प्रत्येक नागरीकांचा विकास झपाटयाने होण्यास मदत होते. एकूणच प्रशासन यंत्रणा पाटीच्या कण्याप्रमाणे शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणुन काम करते. ही प्रशासन व्यवस्था जीतकी जनताभिमुख असेल तीतकीच त्या देशाची जनता अधिक क्रियाशील, विकसीत व प्रगतीशील बनत असते.

गडचिरोली सारख्या अतिमागास जिल्हयात असणाऱ्या या वर्गाची आताची जी स्थिती आहे, त्याला महत्वाची काय कारणे आहेत याचा शोध घेणे महत्वाचे आहे. त्यापैकी प्रशासन यंत्रण हे एक महत्वाचे कारण ठरते. प्रशासन व्यवस्था इथे का सक्रिय झाली नाही, अजनुही प्रशासन जनतेमध्ये का पोहचले नाही, किंबहुना शासनाच्या अनेक योजना या लोकांपर्यंत पोहचल्या नाहीत, जनता विकासापासून का दुर आहे, जनतेची प्रगती न होण्याचे काय करणे आहेत, शासनाच्या अनेक योजना असतांनाही त्याचा लाभ गरीब, वंचीत, अविकसीत आदिवासीपर्यंत का पोहचली नाही, आदिवासी समुदाय या योजनापासून अनभिज्ञ राहिला, याचे उत्तर शोधण्यासाठी प्रशासन यंत्रणेकडे जावे लागते. आदिवासी समुदायाचा जिवनात न पडलेला फरक जाणून घेण्यासाठी तीथल्या प्रशासन व्यवस्थेची जनताभिमुखता, क्रियाशलता तपासणे अत्याधिक महत्वाचे ठरते. प्रशासन जितके सक्रिय, जनताभिमुख, क्रियाशिल असेल तरच त्या समाजातील जनता व सर्वच गटाच्या विकासात, प्रगतीत भर पडायला वेळ लागत नाही. म्हणून गडचिरोली जिल्हयातील प्रशासन यंत्रणा व त्यांचा आदिवासी समाजासोबतचे संबध यांचा तपास करणे महत्वाचे ठरते.

**संशोधनाचे उददीष्टे :–**

1. जिल्हयात कार्यरत प्रशासन वर्गाची कार्यकुशलता, तत्परता व समाजाभिमुखता तपासणे.
2. प्रशासन व आदिवासी समुदाय यातील संबंधाचे अध्ययन करणे.
3. प्रशासन यंत्रणेव्दारे राबवीण्यात येणाऱ्या योजनामुंळे आदिवासी समुदायाला होणाऱ्या फायदयांचा अभ्यास करणे.
4. प्रशासन यंत्रना आदिवासी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या प्रयत्नात यशस्वी झाली किंवा नाही यांचा शोध घेणे.
5. आदिवासी समुदायाच्या विकासात, प्रगतीत किंबहुना त्यांचा संर्वांगीन उदधारात प्रशासन वर्गाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**गृहीतके :–**

1. जिल्हयात कार्यरत प्रशासन यंत्रणा आदिवासींच्या सर्वांगीन विकासासाठी अत्याधिक कार्यकुशल, कर्तव्यनिष्ठ व अधिक समाजाभिमुख झाली आहे.
2. प्रशासकीय यंत्रणा व आदिवासी समुदाय यांच्यातील संबंध अत्याधिक समुधूर आहेत.
3. प्रशासकीय यंत्रणेने शासकीय योजनांचा फायदा आदिवासींना प्रचंड प्रमाणात करुन दिला.
4. प्रशासकीय यंत्रणेमुळे सदर आदिवासी समुदाय मुख्य प्रवाहात आणल्या गेला.
5. आदिवासी समुदायाच्या विकासात प्रशासकीय यंत्रणेचा महत्वपूर्ण वाटा आहे.

**सारणी क्र. 1.**

**शासकीय योजनांची माहिती देण्यासंदर्भातील सारणी**

| अ.क. | प्रतिसाद | वारंवारीता | प्रमाण ;ःद्ध |
|---|---|---|---|
| 1 | होय | 139 | 23.17 |
| 2 | नही | 461 | 76.83 |
| | एकूण | 600 | 100 |

**उत्तर होय असल्यासंदर्भातील सारणी 1.1**

| अ.क. | शासकीय योजनांच्या माहितीचे स्वरूप | वारंवारीता |
|---|---|---|
| 1 | शिबीराचे आयोजन | 67 |
| 2 | पथकाव्दारे जनजागृती | 92 |
| 3 | मेळावे आयोजित करणे | 35 |
| 4 | ईतर | 70 |
| | एकूण | 264 |

उपरोक्त सारणीमध्ये प्रशासकीय अधिकरी आदिवासी समुदायाला शासकीय योजनांची माहीती देतात किंवा नाही यासंदर्भात एकूण 600 उत्तरदात्यांपैकी 139 (23.17 टक्के) उत्तरदात्यांनी नाही तर 461 म्हणजे (78.83 टक्के) उत्तरदात्यांनी नाहीच्या बाजुने आपले मत मांडले आहे. तर होय असणाऱ्या एकूण 23.17 टक्के उत्तरदात्यांनी शासकीय योजनांची माहिती देण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या माध्यमावर बोट ठेवले आहे. त्यात 67 मतदार शिबीरांचे आयोजन करुन, 92 उत्तरदाते पथकाद्वारे जनजागृती करुन तर 35 उत्तरदात्यांनी मेळाव्याचे आयोजन शासकीय योजनांच्या माहितीसाठी करण्यात येते असे सांगीतले तर 70 उत्तरदात्यांनी ईतर या पर्यायावर पसंती दिली आहे. यात पत्रके वाटून, भित्तीपत्रके लावून, होर्डींगजच्या माध्यमातून या पर्यायाचा उपयोग होतो.

यावरुन असे स्पष्ट होते की, शासकीय योजनांची माहिती केवळ काही लोकांपर्यंत पोहचत आहे. शासनाच्या अनेक विकासात्मक योजना असल्या तरी त्या लोकांपर्यत पोहचतांना दिसत नाहीत. शसाकीय योजना लोकांपर्यत पोहचविण्याची जबाबदारी प्रशासनवर्गाची असली तरीपण प्रशासन वर्ग मात्र उदासीन असल्याचे दिसते. प्रशासनाचे कार्य पाहिजे त्या प्रमानात होत नसल्याने अजूनही अधिकाअधिक आदिवासी जमात या योजनांपासून अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या जिवनात या योजनांचा फार उपयोग होतांना दिसून येत नाही. प्रशासन वर्ग अनेक माध्यामांचा काही प्रमानात वापर करुन अनेक योजना लोकांपर्यत पोहचविण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसून येते किंबहूना प्रत्यक्ष संपर्क साधण्यातही येतो. परंतू फायदा फार जास्त लोकांना होतांना दिसून येत नाही. त्यामुळे शासनाच्या आदेशाची अंमलबजावनी म्हणून केवळ औपचारीकता पूर्ण करण्याकरीता प्रयत्न होतांना दिसते. त्याचा फायदा फार जास्त आदिवासी समुदायाला होतो असे म्हणता येत नाही. प्रशासनाने अत्याधिक सक्रीयता दाखवून काम केले तर आदिवासी समुदायाच्या जिवनात आमुलाग्र बदल होउ शकतो. परंतु प्रशासन वर्गाच्या उदासिनतेमुळे हा समाज अजूनही विकासाच्या खूप दूर आहे.

**सारणी क्र. 2**

**शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी संदर्भातील सारणी**

| अ.क्र. | प्रतिसाद | वारंवारीता | प्रमाण ;: द्ध |
|---|---|---|---|
| 1 | होय | 271 | 45.16 |
| 2 | नही | 329 | 54.84 |
| | एकूण | 600 | 100 |

आदिवासी समुदायातील लोकांनी काही कामानिमित्त शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या आहेत काय? यासंदर्भात विचारना केली असता एकूण 600 उत्तरदात्यांपैकी 45.16 टक्के (271) उत्तरदात्यांनी भेटी घेतल्याचे सांगतिले. तर 54.84 टक्के (329) उत्तरदात्यांनी नकारात्मक प्रतिसाद दिला.

यावरुन असे स्पष्ट होते की काही कामानिमित्य 45.16 टक्के उत्तरदात्यांनी शासकीय अधिकाऱ्यांशी संपर्क आल्याचे सांगीतले परंतू अजूनही या जमातीतील मोठा प्रवर्ग अधिकाऱ्यांच्या संपर्कापासून दूर आहे. अधिकारी त्यांचे कार्य, त्यांची कार्यालये याविषयी हा समाज अनभिज्ञ आहे. काही लोकांनी भेटी घेतल्या असल्या तरी त्यांच्या भेटीचा त्याच्या जिवनात फार सकारात्मक प्रभाव पडल्याचे दिसून येत नाही.

**सारणी क्र. 3.**

**शासकीय योजनांचा लाभ सदर समुदायाला होण्यासंदर्भातील सारणी**

| अ.क्र. | प्रतिसाद | वारंवारीता | प्रमाण ;: द्ध |
|---|---|---|---|
| 1 | होय | 478 | 79.67 |
| 2 | नही | 122 | 20.33 |
| | एकूण | 600 | 100 |

**उत्तर होय असल्यासंदर्भातील सारणी क्र. 3.1**

| अ.क्र. | शासकीय योजनांच्या माहितीचे स्वरूप | वारंवारीता |
|---|---|---|
| 1 | कृषीविषयक योजनेचा लाभ | 102 |
| 2 | गृहविषयक योजना | 398 |
| 3 | आरोग्यविषयक योजना | 179 |
| 4 | रोजगारविषयक योजना | 471 |
| 5 | ईतर | 209 |
| | एकूण | 1359 |

उपरोक्त सारणीवरुन शासकीय योजनांचा लाभ या प्रवर्गाला कितपत झाला यासंदर्भातील असून त्यात 79.67 टक्के उत्तरदात्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तर 20.33 टक्के उत्तरदाते लाभ न झाल्याचे सांगतात. लाभ झालेल्या उत्तरदात्यांपैकी अधिकाअधिक म्हणजे 471 उत्तरदाते रोजगारविषयक लाभ झाल्याचे सांगतात. तर गृहविषयक 398 लोकांनी लाभ झाल्याचे सांगीतले. कृषिवियक योजनांचा लाभ 102 तर आरोग्यविषयक योजनांचा लाभ 179 उत्तरदाते झाल्याचे सांगतात.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश आदिवासी समुदायातील लोकांना शासकीय योजनांचा फायदा होत असल्याचे दिसून येते परंतु हा लाभ केवळ रोजगाार विषयक योजनांमधे सर्वांगीन आहे. शासनाव्दारे चालविण्यात

येणाऱ्या रोजगार हमी योजना गावागावात पोहचल्याने केवळ काही दिवसांकरिता रोजगार उपलब्ध होतो. परंतू बाकीच्या योजनांचा मात्र लाभ त्यांना अधिकाधीक होतांना दिसून येत नाही. रोजगाराची संधीही काही दिवसांकरिताच उपलब्ध होते. त्यामुळे त्यांच्या जिवणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येत नाही. एकूणच शासनाच्या योजनांचा फार अल्पसा फायदा या जमातीला होतांना दिसतो.शासनाच्या योजना भरपूर प्रमाणात उपलब्ध असल्या तरी त्या जनतेप्रती पोहचविण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. परंतू प्रशासन यंत्रणा जनताभिमुख काम करण्यात यशस्वी झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे ही जमात खीतपत पडलेल्या अवस्थेत जिवण जगत आहे. त्यांचा अपेक्षित विकास झाला नाही. या अवस्थेला या जमातीची अनभिज्ञता जितकी कारणिभूत आहे तितकीच प्रशासनाची उदासीनता जबाबदार आहे असे म्हणता येते.

**निष्कर्ष :–**

1. आदिवासी समुदायाच्या सर्वांगीन विकासासाठी प्रशासन यंत्रना पाहीजे त्या प्रमाणात कर्तव्यनिष्ठ, तत्पर व समाजाभिमुख झाल्याचे दिसून येत नाही. प्रशासन यंत्रनेने आपली समाजाभिमुखता अत्यधिक सक्रीय करायला पाहीजे हीती किंबहूना त्यात ते अपयशी ठरले.

2. प्रशासन व आदिवासी समुदाय यांच्यातील सहसंबंध लक्षात घेतला तर प्रशासन यंत्रना आदिवासी समुहात अधिकाधिक मिसळत नसल्याचे दिसून येते. फारच कमी वेळ दोघांचाही संबंध येतो. किंबहूना प्रशासनाने दुर्लक्षित, अळानी, अविकसीत आदिवासी समुदायात जाउन, मिसळून त्यांना शासकीय योजनांची माहीती देणे क्रमप्राप्त होते. परंतु असे होतांना दिसत नाही. या समाजाकडे आपणास समाजाचा घटक म्हणून किंवा कुटूंबाचा घटक म्हणून पाहावयास पाहीजे होते. परंतू तसे होतांना दिसून येत नाही. य समाजाकडे आपल्या समाजाचा घटक म्हणून किंवा कुटूंबाचा घटक म्हणून पाहावयास पाहीजे होते. परंतू तसे होतांना दिसत नाही. त्यामुळे दोघांमधिल संबंध खुपच सुमधुर आहेत असे म्हणता येत नाही.

3. प्रशासकीय यंत्रनेने स्वतःला अलिप्त ठेवल्याने, स्वताला समाजाभिमुख न केल्याने अनेक शासकीय योजना आदिवासी समुदायांपर्यंत पोहचविल्या गेल्यात नाहीत. वस्तुतः या यंत्रनेने सदर योजना आदिवासी पर्यंत पोहचवून योजनांविषयी अवगत करूण देणे क्रमप्राप्त होते. परंतू तसे न झाल्याने हा प्रवर्ग या योजनांपासून दुर राहीला. व विकासाची गंगा त्यांच्यापर्यंत पोहचली नाही.व हा समाज विकासापासून कोसो दूर राहीला.

4. प्रशासन यंत्रनेच्या अलिप्ततावादी मानसिकतेमूळे आदिवासी समुदाय मुख्य प्रवाहात येउ शकला नाही. इतर समुदायाचा तूलनेत सदर समाज मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकला गेला

5. एकूणच आदिवासी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्याकरीता प्रशासकीय यत्रंणा यशस्वी झाली असे म्हणता येत नाही.

**संदर्भ :–**

1) डॉ. श्री. म. महाकरकार, 'आदिवासी स्त्री व राजकारण' श्री राजराजेश्वर शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक बहूउददेशीय संस्था चामोर्शी, जि. गडचिरोली., पृ. क. 7.

2) प्रा. ठाकूर सुंदरसिह, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' निर्मळ प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती 2006 पृ. क. 282.

3) डॉ. सौ. शैलजा देवगांवकर, डॉ. शं. गो. देवगांवकर, 'आदिवासी विश्व' आनंद प्रकासन नागपूर,पृ. क. 200